# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## व्हाईट केन डे निमित्त आत्मदीपम सोसायटी आणि महा मेट्रो यांचा संयुक्त उपक्रम

- **दृष्टीबाधितांसाठी सुविधांचा आढावा आणि जनजागृतीचा संदेश सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशनवर**



नागपूर : आत्मदीपम सोसायटी, नागपूर आणि महा मेट्रो नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने व्हाईट केन डे मोठ्या उत्साहात व सामाजिक भान जपत सिताबर्डी इंटरचेंज मेट्रो स्टेशनवर साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे दृष्टीबाधितांच्या गरजा, हक्क आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजनांवर प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस आत्मदीपम सोसायटीच्या अध्यक्षा जिज्ञासा चवलढाल यांनी संस्थेच्या कार्याचा परिचय देताना सांगितले की, "आम्ही दृष्टीबाधितांसाठी केवळ संगणक शिक्षणच नव्हे, तर त्यांचा सर्वांगीण विकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत. आतापर्यंत १४० हून अधिक दृष्टीबाधितांना शासकीय नोकऱ्या व अन्य क्षेत्रात रोजगार मिळवून देण्यात यश आले आहे. त्यानंतर, अल्पदृष्टी व अंध मुलांनी केन डान्स सादर करत व्हाईट केन या त्यांच्या जीवनातील अनिवार्य भागाचे महत्त्व भावनिक पद्धतीने सादर केले.

ट्रेनर अभिषेक शुक्ला यांनी मेट्रोमधील दृष्टीबाधितांसाठी असलेल्या सुविधा — जसे की ब्रेल लिपीतील साईड बोर्ड्स, ऑडिओ अनाउन्समेंट्स, मदत केंद्र इ. — यांची माहिती उपस्थितांना दिली. आपल्या वैयक्तिक अनुभवांची मांडणी करत त्यांनी मेट्रो प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक केले.

अश्विनी टेंभुर्णे यांनी भविष्यातील सुधारणांवर सुचवले की, "लिफ्टजवळ बीपिंग साऊंड, कार्ड स्कॅनिंगसाठी व्हॉईस फीडबॅक, तसेच ऑडिओ गाइड्स या सुविधा असतील तर दृष्टीबाधितांना अधिक सुलभता मिळू शकेल."

मोबिलिटी इन्स्ट्रक्टर निलेश भट आणि आदित्य चिमूरकर यांनी मेट्रो कर्मचाऱ्यांसाठी ‘गाईड टेक्निक’चे प्रात्यक्षिक करून दृष्टीबाधितांना मदत करण्याची योग्य पद्धत समजावून सांगितली.

या वेळी मेट्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिज्ञासा चवलढाल यांना "नागपूरच्या हेलन केलर" या गौरवपूर्ण शब्दांनी संबोधत त्यांचे कार्य गौरवले आणि भविष्यात मेट्रोमध्ये आणखी सुधारणा करण्याचे आश्वासन दिले. यावेळी जिज्ञासा चवलढाल  सांगितले कि "समाज आपल्याला खूप काही देतो, म्हणून आपणही समाजासाठी काहीतरी देणं आवश्यक आहे." कार्यक्रमाच्या शेवटी, दृष्टीबाधित लाभार्थ्यांनी मेट्रोच्या विविध स्थानकांवरून आलेल्या सुमारे ४० मेट्रो कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

या उपक्रमाला महा मेट्रो तर्फे श्री. अखिलेश हळवे, उमेश्वरी हेडाऊ, गौरव शेंडे, तसेच आत्मदीपम सोसायटीतर्फे योगेश्वर चवलढाल, जयंत गुळकरी, गीतांजली केळकर, प्रिया काहाडे, मनिषा बेन्डे, तसेच सोसायटीचा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता..